महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
website : www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/ २२४३८

दिनांक: २३.०९.२०२१

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या,
सर्व परिमंडळ कार्यालय.

**विषय:** **यंत्रचालक पदी सामावून घेतलेल्या कारागीर-'क' (मिटरवाचक/दूरध्वनी परिचर) यांना सा.आ. ७४ (क) दि. ३०.०४.१९७४ नुसार उच्च वेतन श्रेणीचा व्दितीय लाभ मंजूर करण्याबाबत - स्पष्टीकरण.**

**संदर्भ:** १. का.आ. क्र.०४ - क्र.साप्रवि/मुमव्य(तां./आ)/मपूक/कर्मचारी मानके/ १४६६४ दि.१६.०५.२००९.
२. साप्रवि/मु.म.व्य(तां.आ)/मपुक/४४५४ दि. १०.०२.२०१०
३. साप्रवि/मु.म.व्य(तां.आ)/मपुक/७६२४ दि. ०८.०३.२०११
४. साप्रवि/मु.म.व्य(तां.आ)/मपुक/३०२४२ दि. ०४.१०.२०११
५. साप्रवि/मु.म.व्य(तां.आ)/मपुक/३३६५५ दि. १४.११.२०११

उपरोक्त विषयास अनुसरुन सांघिक कार्यालय स्तरावर विविध कर्मचारी संघटनांसोबत बैठक आयोजित करण्यात होती. सदर बैठकीमध्ये कारागीर-'क' यांना यंत्रचालक पदी सामावून घेतलेल्या कारागीर-'क' (मिटरवाचक/ दूरध्वनी परिचर) यांना सा.आ. ७४ (क) दि. ३०.०४.१९७४ नुसार उच्च वेतन श्रेणीचा व्दितीय लाभ मंजूर करण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयांमध्ये तफावत असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

२. याबाबत कळविण्यात येते की, कार्यालयीन आदेश क्र.०४ - क्र.साप्रवि/मुमव्य (तां/आ)/मपूक/ कर्मचारी मानके/ १४६६४ दि. १६.०५.२००९ अन्वये कारागीर-'क' (मिटरवाचक/दूरध्वनी परिचर) हे पद विभागीय व उप विभागीय कार्यालयांमधून बहुविध पदांची भूमिका पार पाडण्याची संकल्पना प्रसृत करण्यात आलेली आहे. सदर बाब विचारात घेउन संदर्भ क्र. २ ते ५ मधील परिपत्रकांन्वये कारागीर-'क' (मिटरवाचक/दूरध्वनी परिचर) यांना यंत्रचालक या पदावर सामावून घेण्याबाबत तसेच त्यांची सेवाज्येष्टता कशाप्रकारे निश्चित करावी याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. कारागीर-'क' (मिटरवाचक/दूरध्वनी परिचर) यांना दि. १६.०५.२००९ पूर्वी पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध नव्हता. दि. १६.०५.२००९ पासून त्यांना कारागीर-'क' यांना यंत्रचालक या पदावर सामावून घेण्यात आल्यानंतर सदर कर्मचाऱ्यांस पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध झालेला आहे, यास्तव अशा कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीचा व्दितीय लाभ मंजूर करतेवेळी खालील सूचनांचा अवलंब करण्यात यावा.

अ) कारागीर-'क' (मिटरवाचक/दूरध्वनी परिचर) पदावरील कर्मचाऱ्यांकरीता दि. १६.०५.२००९ पूर्वी सहा आणि सहा वर्षांचा कालावधी गणना करून उच्च वेतनश्रेणीचा प्रथम तसेच व्दितीय लाभ देय होत असल्यास सा.आ. ७४ (क) दि. ३०.०४.१९७४ मधील तरतूदींच्या अधीन राहून सदर दोन्ही लाभ सहा वर्षांच्या कालावधीने मंजूर करण्यात यावेत.

**उदा.** जर एखादा कर्मचारी, कारागीर-'क' (मिटर वाचक), या पदावर दि. ०१.०२.१९९७ रोजी रुजू झाला असेल तर त्यास उच्चवेतन श्रेणीचा प्रथम लाभ सहा वर्षानंतर म्हणजे दि.०१.०२.२००३ रोजी मंजूर करण्यात येईल व उच्चवेतन श्रेणीचा द्वितीय लाभ दि. ०१.०२.२००९ मध्ये मंजूर करण्यात येईल.

ब) संबंधित कर्मचारी प्रथम लाभ घेतल्याच्या दिनांकापासून सहा वर्षांचा कालावधी जर दि. १६.०५.२००९ नंतर पूर्ण करीत असल्यास तर अशा कर्मचाऱ्यास उच्च वेतनश्रेणीचा प्रथम लाभ घेतल्याच्या दिनांकापासून नऊ वर्षाचा कालावधी पूर्ण केल्याच्या दिनांकास व्दितीय लाभ मंजूर करण्यात यावा.

**उदा.** जर एखादा कर्मचारी, कारागीर-'क' (मिटर वाचक),, या पदावर दि.०१.०२.२००१ रोजी रुजू झाला असेल तर त्यास उच्चवेतन श्रेणीचा प्रथम लाभ सहा वर्षानंतर म्हणजे दि.०१.०२.२००७ मध्ये मंजूर करण्यात येईल व या तारखेपासून सदर कर्मचारी यांना दि. १६.०५.२००९ पर्यंत सहा वर्ष पूर्ण करीत नसल्याने त्याने प्रथम लाभ घेतल्याच्या दिनांकापासून ९ वर्षांनी म्हणजेच दि.०१.०६.२०१६ ला द्वितीय लाभ मिळण्याकरीता पात्र राहील.

४. सबब, सर्व संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, यंत्रचालक पदी सामावून घेतलेल्या कारागीर-'क' (मिटरवाचक/दूरध्वनी परिचर) यांना सा.आ. ७४ (क) दि. ३०.०४.१९७४ नुसार उच्च वेतन श्रेणीचा व्दितीय लाभ देतांना वरील परिच्छेद क्र.३ मधील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच संबधित कर्मचाऱ्यांच्या उच्चवेतनश्रेणीच्या लाभाच्या दिनांकाची दुरुस्ती करुन सुधारीत आदेश दि. ३०.१०.२०२१ पर्यंत निर्गमित करावेत.

**(अ.मी. भादीकर)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर:-**
सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद / कोकण (कल्याण).

**प्रत सस्नेह सादर:-**
प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, पुणे/नागपूर.

**प्रत रवाना:-**
मुख्य औद्योगिक संवंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई-५१.